महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/ १२०३७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०९/०५/२०१९

# परिपत्रक

**विषय : प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दि. १६.०१.२०१३ च्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) सा.आ.क्र. ७ (क) दि. ०३.०८.१९६२ चे सुधारपत्र क्र. १० दि. १९.०६.१९८२.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. १२० दि. २२.०८.१९८९.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. १३८ दि. २६.०८.१९९३.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. १४० दि. १८.०१.१९९४.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दि. १६.०१.२०१३.
६) परिपत्रक क्र. HRD/O&M/F.No.5/18519 Dtd. 02.07.2013.
७) परिपत्रक क्र. मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक/२६०४ दि. २३.१२.२०१६.
८) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/३१७१७ दि. २८.१२.२०१७.
९) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/०९११६८ दि. २३.०४.२०१८.
१०) परिपत्रक क्र. मासं/लेवसं/आस्था/८३५९ दि. २६.०३.२०१९.

म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दि. १६.०१.२०१३ अन्वये निम्नस्तर लिपिक यांचा संवर्ग निश्चीत करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच उच्चस्तर लिपिक (मासं)/(लेखा) या पदी पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने सुधारीत तरतुदी निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार, निम्नस्तर साप्रवि/लेखा या विभागीय परीक्षा सन २०१७ नंतर बंद करण्यात आल्या आहेत. उच्चस्तर लिपिक (मासं)/(लेखा) या पदाच्या पदोन्नतीकरीता दि. १६.०१.२०१३ ते माहे डिसेंबर २०१७ पर्यंत निम्नस्तर विभागीय परीक्षा उत्तिर्ण होणे **अथवा** व्यवस्थापन/ प्रशासन या विषयातील पदव्युत्तर पदवी / कमीत कमी एक वर्ष कालावधीची पदविका परीक्षा **किंवा** मानव संसाधन संवर्गातील कर्मचाऱ्यांकरीता कमीतकमी कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा आणि लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांकरीता वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवी परीक्षा (M.Com) उत्तीर्ण होण्याबाबतचा पर्याय देण्यात आला होता. या तरतुदींच्या अनुषंगाने सेवाज्येष्ठता, पदोन्नती, विभागीय परीक्षा, शैक्षणिक अर्हता इ. बाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून विचारणा केल्या आहेत, त्यानुसार खालील प्रमाणे मार्गदर्शनपर सूचना जारी करण्यात येत आहेत.

१. प्रशासकीय परिपत्रक क्रं. ४४४ दि. १६.०१.२०१३ मधील परिच्छेद क्र. २(क) मधील तरतुदीनुसार निम्नस्तर लिपिक ज्या संवर्गामध्ये कार्यरत आहे त्या संवर्गामध्ये त्याचा समावेश करून सदर प्रशासकीय परिपत्रकामधील परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार निम्नस्तर लिपिक यांच्या दि. ०१.०४.२०१३ रोजीच्या संवर्गनिहाय ("as it is- where it is" basis) सुधारीत ज्येष्ठता याद्या तयार कराव्यात.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दि. १६.०१.२०१३ मधील परीच्छेद क्र. ३ अन्वये संबंधीत कर्मचाऱ्यांना निम्नस्तर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी पुरेशी संधी मिळावी या दृष्टीकोनातून चार वर्षांचा कालावधी (माहे डिसेंबर २०१६ अखेर) देण्यात आला होता. तथापी, सन २०१७ मध्ये कंपनीकडून निम्नस्तर विभागीय परीक्षा घेण्यात आल्या होत्या, यास्तव सदरच्या परीक्षेमध्ये उत्तिर्ण झालेले अथवा सूट मिळालेले कर्मचारी तसेच दि. ३१.१२.२०१७ पर्यंत पदव्युत्तर पदवी/ पदविका परीक्षा उत्तिर्ण झालेले कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरतील.

३. दि. ३१.१२.२०१७ नंतर निम्नस्तर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा पदव्युत्तर पदवी/ पदविका परीक्षा उत्तीर्ण होण्याची तसेच त्यापासून सूट मिळविण्याची आवश्यकता नाही. तसेच उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा), सहाय्यक लेखापाल आणि मुख्य लिपिक या पदावरील नियुक्ती अथवा पदोन्नतीच्या अटी व शर्तीमध्ये, निम्नस्तर विभागीय परीक्षा उत्तिर्ण होणे अथवा पदव्युत्तर पदवी/ पदविका परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा त्यापासून सूट मिळविणे, ही अट लागू राहणार नाही.

४. तदनंतर, निम्नस्तर लिपिक(मासं/लेखा) यांना उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा) पदी पदोन्नती देण्याकरीता दि. ३१.१२.२०१७ रोजीची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात यावी. त्याकरीता, निम्नस्तर विभागीय परीक्षा/ पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा अथवा सूट मिळाल्याचा दिनांक विचारात घेउन प्रशासकीय परिपत्रक क्र १४० दि. १८.०१.१९९४ मधील तरतुदींनुसार पात्रता यादी निश्चीत करावी.

५. वरील मुद्दा क्र. ३ प्रमाणे, पात्रता यादी निश्चीत केल्यानंतर उर्वरीत निम्नस्तर लिपिकांपैकी पदवीधारक (Graduate) निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) यांचा ज्येष्ठता क्रम हा, सेवाज्येष्ठता विनियम - २००५ मधील विनियम क्र. ३,४,५,७ व १७(२) अन्वये विहित केलेल्या तरतुदींनुसार निश्चीत करावा. तसेच, या निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) यांचा, दि. ३१.१२.२०१७ रोजीच्या पात्रता यादीमध्ये शेवटी समावेश करून सदरची पात्रता यादी उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा) पदावरील पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात यावी. या प्रकरणी दि. १६.०१.२०१३ पूर्वी सेवेत रूजु झालेल्या आणि as it is - where it is तत्वानुसार ज्यांचा संवर्ग निश्चीत करण्यात आलेला आहे अशा पदवीधारक निम्नस्तर लिपिक यांची पदवी परीक्षेची शाखा विचारात न घेता त्यांना संबंधीत संवर्गातील वरीष्ठ पदावर पात्रता क्रमांकानुसार पदोन्नती देण्यात यावी.

६. दि. ३१.१२.२०१७ नंतर क्षेत्रिय कार्यालयांकडून निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) ते उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा) पदाच्या पदोन्नती निवड समिती बैठका आयोजित करण्यात आल्या असल्यास आणि पदोन्नती आदेश निर्गमित केले असल्यास अशी प्रकरणे वरील मुद्दा क्र. ३ व ४ मधील सूचना विचारात घेउन नियमित करावीत. आवश्यकता भासल्यास मानीव तारीख देऊन सदर प्रकरणे कंपनीच्या प्रचलित नियमांनुसार निकाली काढावीत.

७. निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) यांनी प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४४ दि. १६.०१.२०१३ मधील मुद्दा क्र. २(ब) मधील तरतुदींनुसार कोणत्याही व्यवसायातील (Specialisation) व्यवस्थापन/ प्रशासन पदव्युत्तर पदवी/ कमीत कमी एक वर्ष कालावधीची पदविका परीक्षा उत्तिर्ण केली असल्यास ते उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा) या पदावरील पदोन्नतीकरीता पात्र ठरतील.

८. जे निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) पदवीधारक नाहीत म्हणजेच ज्यांची शैक्षणीक अर्हता पदवी परीक्षेपेक्षा कमी आहे, त्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्याखेरीज पदोन्नतीकरीता पात्र ठरविता येउ नये. तथापी, जे निम्नस्तर लिपिक (मासं/लेखा) वयाची ४५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी पदवी परीक्षा उत्तिर्ण झाल्यास निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून त्यांना पात्रता यादीमध्ये समाविष्ट करावे.

९. माहे डिसेंबर २०१७ नंतर निम्नस्तर विभागीय परीक्षा बंद करण्यात आल्याने ज्या निम्नस्तर लिपिक/ उच्चस्तर लिपिक यांनी थेट उच्चस्तर विभागीय परीक्षा दिलेल्या आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे उच्चस्तर विभागीय परीक्षेचे निकाल प्रशिक्षण व सुरक्षा विभाग नाशिक यांनी जाहीर करावेत. परंतु, जे निम्नस्तर लिपिक पदवीधारक नाहीत आणि उच्चस्तर विभागीय परीक्षा उत्तिर्ण झाले आहेत त्या प्रकरणी उच्चस्तर विभागीय परीक्षा ही निम्नस्तर लिपिक(मासं/लेखा) ते उच्चस्तर लिपिक (मासं/लेखा) या पदाच्या पदोन्नती करीता ग्राहय धरण्यात येणार नाही.

१०.नव्याने नियुक्तीवर रूजु होणाऱ्या कनिष्ठ सहाय्यक (मासं/लेखा) यांना नियमित पदावर सामावून घेतल्यापासून एक वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर ते उच्चस्तर विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र ठरतील.

२. सबब, क्षेत्रिय कार्यालयातील सर्व संबंधीत सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शनपर सूचना विचारात घेऊन योग्य ती पुढिल कार्यवाही करावी.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal व Employee Portal -eLibrary वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(शिवाजी इंदलकर)
कमांडर (सेवानिवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)